**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-३३६३/२०२४**

**अपिलार्थी, श्री.विजय काशिनाथ पाटील,**
**माऊली निवास, प्लॉट नं. ९५/१,**
**सेक्टर २२, तुर्भेगाव, नवी मुंबई**

विरुध्द

जन माहिती अधिकारी, शहर सेवा विभाग-१,
सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र)
मर्यादित, सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई
४०० ६१४.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, शहर सेवा विभाग-१,
सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र)
मर्यादित, सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई
४०० ६१४.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २८.१०.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.६.२०२४ | ---- | २३.७.२०२४ | --- |

अपिलार्थी यांनी दि.१२.९.२०२४ रोजीच्या अर्जान्वये "माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २८.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(मौजे तुर्भेगाव प्लॉट नं. ११० सेक्टर २१, प्लॉट नं. ७२ अे + ७३ सदर भुखंडाची करारनाम्याची संपूर्ण नस्तीची प्रत मिळणेबाबत व इतर माहिती.) "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "मागितलेली माहिती ३० दिवसामध्ये जाणून बुजून दिली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. तथापि, आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस आयागेकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, शहर सेवा विभाग-१, सिडको यांनी **अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शहर सेवा विभाग-१, सिडको यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १९.६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी, शहर सेवा विभाग-१,
सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी, शहर सेवा विभाग-१,
सिडको, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित,
सिडको भवन सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ **यांचेमार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ